RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स

मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

LATUR लातूर | वर्ष ३४ वे | अंक १४४ वा सोमवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) | पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 | पृष्ठे – ६ | मो:९४२२४७२५०२ | किंमत १ रुपया

# जरांगे-पाटील यांचा सरकारला नवा अल्टीमेटम

## २७ ऑगस्टला मराठा वादळ...

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आणि कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर २९ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्यात येणार आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील हे गणेश आगमनादिवशी बुधवारी २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटीतून मुंबईकडे रवाना होणार असल्याचे सांगितले. ते सोमवारी(दि.२५) अंतरवली सराटी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

अंतरवाली सराटी ते मुंबईच्या प्रवासात जरांगे पाटील आणि कार्यकर्ते बुधवारी २७ ऑगस्ट रोजी मुक्काम शिवनेरी येथे, तर २८ ऑगस्टला सकाळी चाकणहून लोणावळा, वाशी, चेंबूर मार्गे सायंकाळी आझाद मैदानावर पोहोचण्याची योजना आहे. दरम्यान माळशेज घाटाचा मार्ग टाळण्यात आला आहे. मुलांना त्रास होऊ नये म्हणून प्रवासाची काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे मुंबईतील हजारो रस्त्यांपैकी कोणताही एक रस्ता सरकारने आंदोलकांना आझाद मैदानापर्यंत दिला जावा, अशी मागणी देखील जरांगे-पाटील यांनी यावेळी केली आहे.

**मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही: जरांगे-पाटील**

पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे-पाटील म्हणाले की, आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम आहोत. मराठा आणि कुणबी एक आहेत, हा अध्यादेश आम्हाला मंजुरीसह अंमलबजावणी करून पाहिजे. हैदराबाद गॅझेट लागून करून पाहिजे, तुम्ही कारणं सांगणार ते आम्ही ऐकणार नाही. आमच्या नोंदी सरकारी आहेत, त्याला विरोध करण्याचा विषय नाही. आमच्या नोंदी सरकारी आहेत, त्याला विरोध करण्याचा विषय नाही. आमच्या सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करून पाहिजे, त्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी राज्य सरकारला दिला.

मराठा आणि कुणबी एक आहेत, हा अध्यादेश मंजुरीसह अंमलबजावणी करावी, तसेच हैदराबाद गॅझेट लागू करावा, अशी प्रमुख मागणी आहे. सगे सोयरे कायद्याची दीड वर्ष झाली तरी



अंमलबजावणी का केली नाही, असा सवाल करत सरकारच्या हातात आज फक्त दोन दिवस आहे. सरकारने महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील लोकांना वेठीस धरू नये. सरकारने आडमुठ्याच्या भूमिकेत जाऊ नये. मला उद्यापासून बोलायचं नाही. आता चर्चा बंद होणार आहे, असेही जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी मागील दोन वर्षांत सातवेळा आमरण उपोषण करून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी आंदोलन केले आहे. यावेळीही त्यांनी सरकारला आव्हान दिले आहे की, मागण्या पूर्ण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही.

नांदेड जिल्ह्यातील पळसगाव येथे सकल मराठा समाजाची चावडी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत मुंबईला जाण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली असून, मराठा समाज एकजुटीने आपल्या मागण्यांसाठी पुढे सरसावला आहे. आंदोलनाच्या या निर्णायक टप्प्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सरकारने मागण्या मान्य करून तातडीने अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली आहे.

# ईडीने छापा टाकला, आमदार भिंतीवरून उडी मारून पळून गेले

## फोनही नाल्यात फेकला; अधिकाऱ्यांनी केली अटक

मुर्शिदाबाद (वृत्तसेवा)-पश्चिम बंगालमधील शाळांमध्ये शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या भरतीतील कथित अनियमिततेच्या चौकशीच्या संदर्भात ईडीने छापे टाकले. ईडीने सोमवारी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार जीवन कृष्णा साहा यांना अटक केली. पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील आमदाराच्या निवासस्थानी छापे टाकल्यानंतर केंद्रीय तपास यंत्रणेने त्यांना ताब्यात घेतले.



छाप्यादरम्यान आमदाराने भिंतीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यांचे फोनही घरामागील नाल्यात फेकून दिले. नंतर अधिकाऱ्यांनी हा फोन जप्त केला. छाप्याच्या व्हिडीओ आणि फोटोंमध्ये आमदार भिजत असताना ईडी आणि केंद्रीय राखीव पोलिस दल अधिकाऱ्यांनी झाडे, आणि कचरा पसरलेल्या परिसरातून घेऊन जात असल्याचे दिसत आहे. बुरवान विधानसभा मतदारसंघातील आमदाराला एजन्सीला सहकार्य न केल्याबद्दल मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत अटक करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

**आतापर्यंत यांना अटक**

ईडीने पश्चिम बंगालचे माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी, त्यांची कथित सहकारी अर्पिता मुखर्जी, तृणमूल काँग्रेसचे आमदार आणि पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष माणिक भट्टाचार्य यांच्यासह काही इतरांना या प्रकरणात अटक केली होती. ईडीने अटक केल्यानंतर तृणमूल काँग्रेसने चॅटर्जी यांना निलंबित केले.

# शेळगाव हादरलं! तिरू नदीत सुटकेसमध्ये आढळला महिलेचा मृतदेह, हत्येचे गूढ वाढले!



**चाकूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील शेळगाव येथील तिरू नदीत सुटकेसमध्ये एका अज्ञात महिलेचा मृतदेह सापडल्याची घटना समोर आली आहे. ही घटना रविवारी (दि.२४) सायंकाळी ४ वाजता उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा असून याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

चाकूर ते वाढवणा रस्त्यावरील शेळगाव गावाच्या जवळील तिरू नदीत रस्त्यावरील पुलावरून एका सुटकेसमधून अज्ञात महिलेचा मृतदेह झाडीत फेकून देण्यात आला. रविवारी सायंकाळी चारच्या सुमारास या भागातील शेतकऱ्यांना उग्रवास येत असल्याने त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. दरम्यान वाढवणा पोलिस ठाण्याचे पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल गायकवाड, चाकूरचे पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी येत पाहणी केली असता सुटकेसमध्ये २५ ते ३० वर्षे वयोगटातील महिलेचा मृतदेह आढळून आला. जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह आणखी एक पोलिसांचे पथक सायंकाळी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी चापोली येथील आरोग्य केंद्रात पाठविला. ही महिला कोण? आणि तिचा खून का करण्यात आला? याचा पोलिसांकडून विविध मार्गाने शोध सुरू आहे.

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सुरज पाटील यांच्या हस्ते व्यायाम शाळेचे उद्घाटन

**शिरूर ताजबंद/प्रतिनिधी :** येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सुरज पाटील उपसरपंच शिरूर ता. यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जयंती मंडळाच्या तरुणांनी व्यसनाकडे न जाता व्यायाम करून सुदृढ बनावे व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे व वस्ताद लहुजी साळवे यांचे स्वप्न पूर्ण करावे असे आवाहन करून त्यांच्यासाठी जिम चे साहित्य घेऊन देऊन व्यायाम शाळेचे उद्घाटन अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे नगर येथे केले व भविष्यामध्ये ही व्यायाम शाळा विस्तृत प्रमाणे बांधून देण्याची आव्हान केले

यामुळे जयंती मंडळातील सर्व युवकांनी उपसरपंच सुरज पाटील यांचा सत्कार अँड टी



एन कांबळे यांच्या हस्ते केला.

यावेळी साहेबराव जाधव माजी सरपंच, अँड टी .एन. कांबळे माजी सभापती जि प लातूर, मच्छिंद्र वाघमारे सरपंच शिरूर ता. गोविंदराव कापसे उपचेअरमन, विक्रम भोसले धम्मपाल सरवदे, गणेश माने व सर्व ग्रामपंचायत सदस्य व जयंती मंडळाचे अध्यक्ष नवनाथ वाघमारे व त्यांचे सर्व सहकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# गणेशोत्सवाच्या अनुषंगाने आणखीन एक सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार

## उत्सव काळात शांतता अबाधित राखणेकरिता पोलिसांची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या अनुषंगाने आणखीन एक सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आला असून याबाबत पोलीसाकडून मिळालेली माहिती अशी की,लातूर जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात येत असून पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीतील इसम ऋषिकेश उर्फ बंटी याला हद्दपार केले आहे.

त्यांच्यावर सन २०१८ ते २०२५ कालावधीमध्ये मारामारी करण्याचे, धमकी देणे शरीराविषयी गंभीर गुन्हे खुनाचा प्रयत्न सार्वजनिक मालमत्तेस नुकसान अशासारखे अनेक गुन्हे दाखल असून लोकांससोबत किरकोळ कारणावरुन हाणामारी करुन दहशत निर्माण करणेच्या सवयीचा असून त्याचे वर्तनामुळे आगामी काळात राज्यात जिल्हायात शहरात जयंती, उत्सव, सण, निवडणुका मध्ये विघ्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने ऋषिकेश उर्फ बंटी यास लातूर जिल्हायातुन एका वर्षाकरिता हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे.

यासंदर्भात पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बिराप्पा भुसनूर यांनी नमूद आरोपी विरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, अहमदपूर डॉ. मंजुषा लटपटे यांच्याकडे हद्दपारचा प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करण्यासंदर्भात आदेशित केले होते. त्यावरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी,अहमदपूर अरविंद रायबोले यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे अहमदपूर चे पोलीस निरीक्षक बी.डी. भुसनूर यांनी नमूद आरोपी विरुद्ध सविस्तर हद्दपारचा प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी अहमदपूर यांचे कार्यालयात सुनावणी अंति नमूद आरोपीस मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६(ब)अन्वये एक वर्षा करिता लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे. आगामी काळात साजरे होणारे सण-उत्सव व येणारे काळात होऊ घातलेल्या निवडणुकांचे अनुषंगाने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (ब) प्रमाणे कार्यवाही करून सदर सराईत गुन्हेगाराला लातूर जिल्ह्यातून एक वर्षा करिता हद्दपार करण्यात आले आहे.

# ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्यावतीने ग्रंथमित्र पवार, जाधव यांचा हृद्य सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** सार्वजनिक ग्रंथालय विकास परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने रविवारी सन २०२३ - २४ चे ग्रंथमित्र पुरस्कार विजेते धनंजय पवार, सूर्यकांत जाधव यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२३-२०२४ चा डॉ. एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र) हा राज्यस्तरीय पुरस्कार धनंजय पवार यांना तर विभागीय पातळीवरील डॉ. एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार आलमला येथील ग्रंथपाल सूर्यकांत जाधव यांना नुकताच मुंबईत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. या दोन्ही मान्यवरांचा सार्वजनिक ग्रंथालय विकास परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने रविवारी हृद्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते,जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, सचिव संतोष करमले,सहसचिव गुप्तलिंग स्वामी,सौ.नागेश्वरी पांचाळ,महामुनी गुरुजी, किशोर देशमाने, विलास नागरगोजे, शिवहार बिराजदार, कृष्णा पिंजरे, नागनाथ नागरगोजे, सतीश माकणे, सचिन ऊफाडे, उमाकांत कुलकर्णी, रामानंद स्वामी, महेश गणाचार्य आदींची उपस्थिती होती.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यातील ३५०० गाव स्मार्ट इंटेलिजन्स करणार-मुख्यमंत्री

## चिमटा दयाचा



गणपती उत्सव ज्या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी चालू केला होता ! तो हेतू व उद्देश सध्याला विसरून जात आहेत !!

# प्लास्टिक पिशव्यांवर मनपाचा स्ट्राईक, ९५० किलो प्लास्टिक जप्त

## – १ लाख ६५ हजार रुपये दंडाची वसुली – शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने गेल्या काही दिवसात प्लास्टिक विरोधात जप्तीची मोहीम राबविण्यात येत आहे. रविवारीही मोहीम सुरू होती. या अंतर्गत शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी धाडी टाकून ९५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.प्लास्टिक वापरणाऱ्यांकडून १ लाख ६५ हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला.

मनपाच्या स्वच्छता विभागाच्या वतीने गेल्या काही दिवसांपासून शहरात बंदी असणाऱ्या सिंगल युज प्लास्टिक वापरा विरोधात मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत प्लास्टिक विक्री करणारे तसेच वापर करणाऱ्यावर कारवाई केली जात आहे. या मोहिमेत आतापर्यंत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

या मोहिमेला गती देण्यासाठी मनपा आयुक्त



श्रीमती मानसी यांनी शहरातील १८ प्रभागात एकाच वेळी प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्याचे आदेश दिले. त्यानुसार प्रत्येक प्रभागात एक अधिकारी व स्वच्छता निरीक्षक आणि त्यांच्या सोबतीला सात ते आठ कर्मचारी असे गट करून जप्तीची मोहीम राबविण्यात आली. पालिका उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी या मोहिमेचे नियोजन करत कारवाईला अंतिम रूप दिले.

एकाच वेळी शहराच्या विविध भागात प्लास्टिक विक्रेत्यावर धाडी पडल्या. यात ९५० किलो प्लास्टिक पालिकेने जप्त केले.संबंधितांना १ लाख ६५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला.

सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणाची मोठी हानी होते.शासनाकडून अशा प्लास्टिकवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांनी या प्लास्टिक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करून पर्यावरण रक्षणास मदत करावी, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. प्लास्टिक विरोधातील मनपाची मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे. त्यामुळे व्यावसायिक आणि नागरिकांनी प्लास्टिकचा वापर करू नये,असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पाकची नाकेबंदी केली पाहिजे

पाकिस्तान हा भारताचा कधीही मित्र होवू शकत नाही. कारण पाकिस्तानी नागरिकांच्या मनात विनाकारण भारताविषयी द्वेशभावना भडकावण्यात आली आहे. भारताविषयी प्रेम नाही कारण सतत पाकिस्तानी नागरिकांच्यामनात भारत हा मैत्रीला योग्य नाही अशी भावना रुजविण्यात आली आहे. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानदरम्यान कदापी मित्रत्वाची भावना होणार नाही. भारताने यापुर्वी सतत मैत्रीचा हात पुढे केला होता. याला विरोध करण्यात आला आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपायी यांनी तर अनेकदा प्रयत्न केले. त्यांनी बससेवा सुरू केला. रेल्वे सेवा सुरु केली, जे पाकिस्तानात रुग्ण उपचार घेण्यासाठी भारतात येवू शकतात याची सुविधा दिली. अनेक गंभीर रुग्ण भारतात उपचारादरम्यान आहे. काहीजन परत गेले नाही. आजही भारतात पाकिस्तानी नागरिक मोठ्या प्रमाणात लपून राहातात असे निर्दशनास आले आहे. याची शोध मोहिम सुरू केली आहे. मध्येच का थांबविली हे कळून येत नाही. पाकिस्तानी नागरिकांना भारताकडून अपेक्षा अधिक आहेत. सिंधुनदीचे पाणी रोखल्यानंतर अनेक बाबी कळून आल्या. भारत हा शेजारी राष्ट्र आहे. शेजारी हाच संकटकाळात धावुन येणारा मित्र समजला जात असला तरी पाकिस्तान भारताला दुष्मन समजत आहे. भारताने पहलगामघटनेनंतर, ऑपरेशन सिंदुर राबविले. यात पाकिस्तानचे अधिक नुकसान मानवतेच्यादृष्टिने केले नाही. भारताच्या गिळंकृत भागातच कारवाई केली. पाकिस्तान तसा हुशार देश आहे. त्याने काश्मीरचा भाग ताब्यात घेतला आहे. पाकव्याप्त काश्मीरात भारताविरोधी कारवाईचे कॅम्पस् निर्माण केले आहेत. या भागात अतिरेक्याचे कॅम्पस आहेत. येथेच भारताविरोधी कार्य केले जाते. जम्मूकाश्मीरात लपून शिरकाव कारवयाचा व भारतीय नागरिक, जवानावर गोळीबार करावयाचा, हिंसा घडवायाचे हे काम सुरू आहे. त्यामुळे भारताने आज पर्यंत जशासतसे उत्तर दिले नाही. मवाळ धोरणाचा लाभ पाकिस्तान घेत आहे. पाकिस्तानला संकटकाळात अमेरिका किंवा चीन साथ देईल असा समज आहे. भारतापुढे हे दोघे काही करू शकणार नाहीत. कोणीही विचारपुर्वक कारवाई करीत असतो.भारताची ताकद मोठी आहे. भारताला रशियाचा मोठा पाठींबा आहे. त्यामुळे अमेरिका भारतावर जळत आहे. भारतावर निर्बंध लादत आहे. भारत असा देश आहे की, सर्वाशी मित्रत्वाची भावना ठेवतो. भारताने आज पर्यंत कोणावरही आपणहोवुन हल्ला केला नाही. केला तर त्याला सोडले नाही. राजकिय नेत्याच्या मवाळ धोरणामुळे आज पाकिस्तान व चीनमध्ये भूभाग ताब्यात आहे. जर भारताचे नेतृत्व एखाद्या मजबुत व्यक्तीकडे असते तर कोणाचीही हिंमत भारताला डवचण्याची नव्हती. भारताने मजबुत भुमिका घेताच ड्रम्प नरमले आहे. भारताने स्वदेशी नारा दिला. याला जनतेनी प्रतिसाद दिला. कितीही दबाब आणला तरी कच्चे तेल भारत रशियाकडून खरेदी करत आहे. उलट नेहमीपेक्षा रशियाने तेलाचे दरकमी केले आहे. भारताने आपली भुमिका मजबुत दर्शविला आहे. भारताने पन्नासटक्के टैरिफ आकारणी जवळपास फेटाळली आहे. ती लागू करण्याची हिंमत अमेरिकेनी अजूनतरी दखविली नाही. केवळ अमेरिका दम देत असून भारताची क्षमता आजमाववुन पाहात आहे. त्यामुळे भारताने आज पर्यंत दाखविलेली ताकदीचा अंदात तसा पाकिस्तानला नसावा. पाकिस्ताने पहलगामध्ये कारण नसताना नाव विचारुन भारतीय हिंदूवर गोळ्या घातल्या. यातून काय साध्य झाले. उलट भारताने ऑपरेशन सिंदुर यशस्वी करून दाखविले. याचे परिणाम जगात दिसून येत आहे. पाकिस्तान तसा विश्वासास पात्र देश नाही. अधूनमधून गोळ्या घालणे चालू आहे. काही भागातकडे वक्र नजर दिसून येत आहे. जो पर्यंत पाकिस्तानी नागरिकाना भारताविषयक प्रेम निर्माण होणार नाही तो पर्यंत कोणतेही प्रयत्न केले तरी निष्फळ ठरणारे आहेत. पाकिस्तानी नागरिक व देशकर्ते यांचा विश्वास चीन व अमेरिकेवर आहे. एकदा का होईना पाकिस्तानला अद्दल घडविण्याची गरज आहे. जो पर्यंत पाकव्याप्त काश्मीर भारताला परत देणार नाही तो पर्यंत पंतप्रधान मोदी शांत राहाणार नाहीत. मुळात पाकिस्तानी हा बळकावलेला प्रांत आहे. तो काही स्वखुशीने पाकिस्ताला दिला नाही. फाळणी नंतर पाकव्याप्त काश्मीर बळावाला आहे. भारताने मोठ्या प्रमाणात नाकेबंदी केली पाहिजे. केवळ सिंधुचे पाणी रोखणे एवढ्यावर पाकिस्तान सरळ होणार नाही. आर्थिकझळ दिली पाहिजे. तशी सध्याला पाकिस्तानची आर्थिकस्थिती मजबुत नाही. सिंधुचे पाणी रोखल्याने या भागातील शेतकरी नरमले आहेत. पाकिस्तानला पाणी रोखल्याची जाणीव होत आहे. मात्र पाकिस्तान हा मजबुर दिसून येत आहे. मुळात पाकिस्तानी नेते हे अविचारी आहेत. पाकिस्तानी हिंसात्मक भाषा बोलतात मात्र भारत मवाळ वागत आहे. पाकिस्तानी जेवढे काही राजकिय नेते आहेत त्यांनी एकत्र येवून विचार करावा, त्यांनी एक समिती निर्माण करावी. भारताशी असलेले वैर संपुष्ठात आणावे. जे कळीचे मुद्दे आहेत ते संपविले पाहिजे. तरच पाकिस्तान काही प्रमाणात सधन होवू शकेल. त्याच प्रमाणे पाकिस्तानबाबत भारताने काही अंतर्गत बाबी उघड न करता गणीमी काव्याने हात दाखविला पाहिजे, त्याच प्रमाणे गाफील राहाता कामा नये. विश्वास पात्र पाकिस्तान नाही. नागरिक जरी धार्मिक असले तरी हिंसात्मकधार्मिकता आहे. त्यांच्या देशात तसे पाहिले तर धार्मिकता नाही तर विचार, मत पंत आहेत. धार्मिकता केवळ भारतात आहे. त्यामुळे जशासतसे उत्तर देणे व वेळीच नांगी ठेचणे हे काम सतत करावे लागणार आहे. पाकिस्तानला जेरीस आणण्याचा सतत प्रयत्न केला तरच पाकिस्तान सुता सारखा सरळ होवू शकेल. नसता नांगी सतत मारणार असून घायाळ करणारा विषारी देश आहे हे सतत लक्षात ठेवेल पाहिजे.

# चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते पोळ्यानिमित्त पूजन

**बाभळगाव/प्रतिनिधी :** भारतीय कृषी संस्कृतीचा आत्मा असलेल्या पोळा सणाचा उत्साह शुक्रवारी सर्वत्र दिसून आला. या विशेष दिवशी, वाभळगाव येथे विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते बैलांचे पूजन करण्यात आले.

शेतकरी सोबत त्याच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणाऱ्या बैलांच्या अनोख्या नात्याचा हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. या प्रसंगी पोळा सणाबद्दल त्यांनी सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा दिल्या.

पोळा हा सण केवळ बैलांची पूजा करण्याचा दिवस नसून वर्षभर शेतीत घाम गाळणाऱ्या त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा क्षण आहे. ग्रामीण



जीवनातील हा उत्सव आपल्याला मातीशी आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याची आठवण करून देतो. या सोहळ्यानिमित्त श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी बैलांची मनोभावे पूजा केली.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, भारतीय शेतीमध्ये बैलांचे महत्त्व अनमोल आहे. यांत्रिकीकरण वाढत असले तरी शेतीचा खरा आधार बैलच आहेत. त्यांच्या श्रमामुळेच शेतकरी त्याच्या शेतात सोन्यासारखे पीक पिकवू शकतो.

या प्रसंगी उपसरपंच गोविंद देशमुख, अविनाश देशमुख, महादेव जटाळ, महादेव देशमुख, भीमा शिंदे, सचिन मस्के, मुक्ताराम पिटले,गोपाळ थडकर आदी उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणाद्वारे राज्य विकासपथावर अग्रेसर– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभर रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला असून मुख्यमंत्री म्हणून मला आतापर्यंत ३६ लाखांहून अधिक भगिनींनी राख्या पाठविल्या आहेत. यामध्ये बहिणींचे निस्सीम प्रेम आणि आशीर्वाद आहेत. महिलांना सक्षम बनविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत विविध योजना राबविल्या जात असून महिला सक्षमीकरणाद्वारे राज्य विकासपथावर अग्रेसर राहिल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून भगिनींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राख्या पाठविलल्या रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम दादर येथील योगी सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, स्थानिक लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे उद्दिष्ट समोर ठेवले असून हा विकास महिलांच्या सहभागाशिवाय शक्य नसल्याचे सांगून पंतप्रधानांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून बेटी बचाव पासून 'लखपती दीदी' पर्यंत अनेक योजना राबविल्या आहेत. लखपती दीदी योजनेच्या माध्यमातून राज्यात मागील वर्षी २५ लाख भगिनी लखपती बनल्या असून राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे. यावर्षीही तितक्याच महिला लखपती बनणार असून एक कोटी भगिनींना 'लखपती दीदी' बनविण्याचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यात १५०० रुपयांच्या निधीतून भगिनी स्वावलंबनाचे नवे मार्ग शोधत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केला. महिला सक्षम झाल्या तर परिवार आणि समाज सक्षम होतो. महिलांच्या आर्थिक क्रियाशीलतेवर प्रकाश टाकताना विविध माध्यमांतून महिलांना दिलेले कर्ज शंभर टक्के वसूल झाले असल्याचे त्यांनी सांगितले. शासन लवकरच महिला सहकारी संस्थांना हक्काचे काम देणार आहे. उद्योग, व्यवसाय, क्षेत्रांत महिलांना प्रोत्साहन देण्यात येत असून राज्यात येत्या पाच वर्षांत महिलांसाठीची एकही योजना बंद होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# अपघाती मृत्यू रोखण्यावर भर द्यावा –परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## पदोन्नत अधिकाऱ्यांचा पद अलंकरण सोहळा



**मुंबई/प्रतिनिधी :** विभागाच्या आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच ३३१ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांना मोटार वाहन निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीने अधिकारांबरोबरच जबाबदारीमध्ये वाढ झाली आहे. पदोन्नत अधिकाऱ्यांनी राज्यात रस्ता सुरक्षा वाढवून अपघाती मृत्यू रोखण्यावर भर देण्याचे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

मोटार वाहन निरीक्षकपदी पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या गणवेशावर नव्या पदाचे चिन्ह लावून पदभार स्वीकारण्याचा समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना परिवहन मंत्री श्री सरनाईक बोलत होते. कार्यक्रमाला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, अतिरिक्त परिवहन आयुक्त भरत कळसकर, सह परिवहन आयुक्त संजय मेहेंत्रेवार, जयंत पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, विनोद सागवे आदी उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एस. टी. महामंडळाच्या माध्यमातून तळागाळातील नागरिकांची सेवा करण्यात येते. राज्यात पाचव्या क्रमांकावर महसूल मिळवून देणारा हा विभाग असून विभागामध्ये आमूलाग्र सुधारणा करण्यात येत आहेत. पदोन्नत झालेल्या ३३१ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकच्या रिक्त जागांवर नवीन उच्च शिक्षित उमेदवारांना संधी मिळणार आहे. त्यामुळे विभागात आणखी उच्च शिक्षित व तंत्रज्ञानस्नेही मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

राज्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी गतिरोधक मुक्त यंत्रणा विकसित करावी. तसेच एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबरोबरच अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. तसेच रस्त्यांवर दिशादर्शक फलकांची संख्या वाढविण्यात यावी. अपघात होऊच नये अशी व्यवस्था निर्माण करावी. पदोन्नत झालेल्या



अधिकाऱ्यांनी विभागाची प्रतिमा नेहमी उज्ज्वल ठेवण्याची दक्षता बाळगावी असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

परिवहन आयुक्त विवेक भीमनवार म्हणाले, पदोन्नतीने जबाबदारीत वाढ झाली आहे. वाहनांची संख्या, तंत्रज्ञान वाढत आहे. मोटार वाहन निरीक्षक हे विभागाची ओळख आहे. त्यामुळे आपली जबाबदारी जास्त आहे. परिवहन विभागाच्या सेवांची तुलना अन्य प्रगत देशाशी होत आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर असलेल्या सेवांची नागरिकांची अपेक्षा आहे. नागरिकांच्या उंचावलेल्या अपेक्षापूर्तीसह अपघातांची संख्या रोखण्याचे आव्हान विभागासमोर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अपघातांची संख्या रोखण्यावर भर देण्यात येत आहे. भारतातील सर्वात मोठी आयटीएमएस (इंटरनेटेड ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम) प्रणाली उभारत आहेत. अपघाती मृत्यू मागील दोन वर्षापासून कमी होत आहे. रस्ता सुरक्षा ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

प्रास्ताविक अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांनी केले. कार्यक्रमादरम्यान प्रातिनिधिक स्वरूपात ८ अधिकाऱ्यांना पद अलंकरण करण्यात आले. यावेळी पदोन्नत अधिकाऱ्यांना कर्तृत्वाची शपथ देण्यात आली. पदोन्नत अधिकाऱ्यांच्यावतीने मोटार वाहन निरीक्षक प्रवीण हरदे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन परिवहन अधिकारी अनिल पाटील यांनी तर आभार विजय इंगोले यांनी मानले.

# तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत माध्यमिक आश्रम शाळा, धसवाडी चे घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी :** तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा शिरूर ताजबंद येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या प्रांगणामध्ये आज दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी पार पडल्या. बॅडमिंटन स्पर्धेत ''माध्यमिक आश्रम शाळा, नाईकनगर,धसवाडी तालुका– अहमदपूर, जिल्हा – लातूर या शाळेतील खेळाडूंनी नेत्र दीपक असे यश मिळविले. १९ वर्ष वयोगटातील मुलींचा संघ जिल्हास्तरासाठी पात्र ठरला. सतरा वर्षीय वयोगटातील मुलांचा व मुलींचा संघ जिल्ह्यासाठी पात्र ठरला. १४ वर्षे वयोगटातील मुलांचा संघ जिल्ह्यासाठी पात्र ठरला तर १४ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ द्वितीय आला.

धसवाडीच्या आश्रम शाळेने खेळातील आपला दबदबा कायम राखल्याबद्दल एकलव्य मागास सेवा समितीचे अध्यक्ष तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते, ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आदरणीय श्री. शिवाजीरावजी विठ्ठलराव भिकाने साहेब, संस्था सचिव श्री.सचिनराव शिवाजीराव भिकाने साहेब, संस्था कोषाध्यक्षा तथा लातूर जिल्हा परिषद सदस्या आदरणीय सौ. मुद्रिकाबाई शिवाजीराव भिकाने मॅडम, संस्था सहसचिव तथा प्राचार्य डॉ.श्री.शशिकिरण उत्तमराव भिकाने साहेब या सर्वांनी शाळेतील सर्व विजयी खेळाडूंचे, मुख्याध्यापक श्री.बालाजीराव झाडे सर,क्रीडा शिक्षक श्री.लहू चव्हाण सर,प्रशिक्षक श्री.दिनकर गुट्टे सर, कोच श्री.भागेश निवृत्तीराव आरदवाड सर, वस्तीगृह अधीक्षिका श्रीमती.भाग्यश्रीताई पाटील मॅडम व सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# गणेशोत्सव निमित्त मालमत्ताधारकांना मनपाची भेट, मालमत्ता कर १०० % शास्ती माफी योजना

**लातूर/प्रतिनिधी :** दि. २४ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर पर्यंत १००% शास्ती माफी योजना लागू या आर्थिक वर्षातील शेवटची १००% शास्ती माफी योजना असल्याने अधिकाधिक थकबाकीदारानी सुवर्णसंधीचा लाभ घेऊन थकीत मालमत्ता कर भरणा करावा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांचे आवाहन यांनी केले आहे.

कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीपासूनच १००% मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार चालू वर्षातील मालमत्ताधारकांसाठी सूट व थकबाकीधारकांसाठी शास्ती माफी योजना वेळोवेळी लागू करण्यात आली होती. त्या अंतर्गत विविध प्रकारचे सुट व १००% शास्ती माफी योजना ही लागू करण्यात आली होती. सदरील सुटचा लाभ घेऊन आतापर्यंत २० हजार हून अधिक मालमत्ताधारकांनी आपला टॅक्स भरणा केला आहे, परंतु वारंवार प्रशासनामार्फत आवाहन करूनही व सूट लागू करूनही काही मालमत्ताधारक प्रतिसाद देत नसल्याने पुढील महिन्यापासून जप्तीची धडक मोहीम राबविण्यात येणार आहे. परंतु तत्पूर्वी थकबाकीदार मालमत्ताधारकांना शेवटची संधी देण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा १००% शास्ती माफी ची योजना लागू करुन थकबाकीधारकांना टॅक्स भरणा करण्याची संधी देण्याच्या निर्णय आयुक्त तथा प्रशासक श्रीमती




मानसी यांनी घेतला आहे . तेव्हा सर्व मालमत्ताधारकांना कळविण्यात येते की, गणेशोत्सव निमित्त लागू केलेल्या ऑफर अंतर्गत दिं.२४ ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एक रक्कमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये १०० टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच १००% शास्ती सुट योजना या वर्षात तिसऱ्यांदा लागू करण्यात आली असून ही शेवटची संधी असून यानंतर पुन्हा ही योजना लागू होणार नसल्याचे निर्णय घेण्यात आला आहे तरी अधिकाधिक थकबाकीदारानी सुवर्णसंधीचा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा.

तरी या योजनेचा सर्व थकबाकीधारक मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे व पुढील महिन्यापासून सुरू होणारे जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.




## थोडक्यात/ संक्षिप्त

### पुजाराच्या निवृत्तीवर शशी थरूर यांची भावनिक पोस्ट; नेमके काय म्हणाले?

दिल्ली-भारताच्या कसोटी क्रिकेट संघातील अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. पुजाराने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत क्रिकेटला राम राम केला आहे. ३७ वर्षीय पुजाराला भारतीय कसोटी संघासाठी १०३ सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याने ७,१९५ धावा जमवल्या आहेत, ज्यात १९ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२३ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. हा त्याच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरला.

चेतेश्वर पुजाराच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर काँग्रेस नेते व लोकसभा खासदार शशी थरूर यांनी एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये थरूर यांनी म्हटलं आहे की ''चेतेश्वर पुजारासारख्या उत्तम कसोटी खेळाडूला सन्मानाने निरोप मिळायला हवा होता. पुजारा जिथपर्यंत पोहोचला आहे ती कामगिरी करायला खूप त्याग करावा लागतो.''

पुजाराला सन्मानजनक निरोप मिळायला हवा होता : थरूर

शशी थरूर म्हणाले, ''पुजाराच्या निवृत्तीनंतर मनात एक हुरहुर कायम राहणार आहे. अलीकडच्या काळात त्याला भारतीय संघात संधी मिळत नव्हती. तो संघातून बाहेर होता. त्यामुळे आज ना उद्या त्याचा हा निर्णय येणार हे जवळपास ठरलेलेच होते. तसेच त्याच्याकडे स्व:ला सिद्ध करण्यासाठी काही उरले नव्हते. तरीसुद्धा त्याने अजून थोडा वेळ संघासाठी खेळायला हवे होते असे वाटतेय. त्याच्या शानदार कसोटी कारकिर्दीसाठी त्याला एक सन्मानजनक निरोप मिळायला हवा होता.''

पुजाराने काय म्हटलेय?

पुजाराने भारतीय कसोटी संघात पुनरागमन करण्याचे भरपूर प्रयत्न केले होते. परंतु, त्याच्या प्रयत्नांना यश आले नाही. अखेर त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. पुजाराने आपल्या एक्स अकाऊंटवरून पोस्ट शेअर करत लिहिले की, ''भारतीय संघाची जर्सी परिधान करणे, राष्ट्रगीत म्हणणे आणि दरवेळी मैदानात उतरून संपूर्ण ताकदीने खेळणे, ही भावना शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. ते म्हणतात ना, प्रत्येक गोष्टीचा शेवट असतो. तसेच मी आता भारतीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे.''

***

### भारतीय क्रिकेटपटूचा भीषण अपघातात मृत्यू

मुंबई,-रस्ते अपघातामध्ये भारतीय क्रिकेटपटूचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या अपघाताचं धक्कादायक सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. हा क्रिकेटपटू स्कुटरने बाहेर चालला होता, तेव्हाच रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या कारमधील दरवाजा उघडला गेला आणि त्याची स्कुटर जाऊन कारला धडकली, यामध्ये क्रिकेटपटूला जीव गमवावा लागला आहे.

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातून फरीद हुसैन हा त्याच्या स्कुटरने प्रवास करत होता, तेव्हा हा अपघात झाला. फरीद हुसैन स्कुटरने जात असताना रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या कारमधील व्यक्तीने अचानक दरवाजा उघडला आणि हा अपघात झाला आहे. २० ऑगस्टला घडलेल्या या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे.कारचा दरवाजा उघडल्यामुळे फरीद हुसैनच्या स्कुटरने कारला जोरदार धडक दिली, यानंतर फरीद हुसैन स्कूटरवरून खाली पडला आणि गंभीर जखमी झाला. यानंतर फरीदला उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, पण डॉक्टरांना फरीदला वाचवण्यात यश आलं नाही. शनिवारी फरीद हुसैन याचे निधन झाले.क्रिकेटची आवड असलेल्या फरीद हुसैनला त्याच्या प्रतिभेमुळे उदयोन्मुख खेळाडू म्हणून पाहिलं जात होतं. जम्मू-काश्मीरच्या स्थानिक क्रिकेट स्पर्धामध्ये फरीद हुसैन खेळायचा. जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट वर्तुळातही त्याने नाव कमावलं होतं. फरीदच्या अकाली निधनामुळे त्याचे सहकारी, खेळाडू आणि चाहत्यांमध्ये शोक पसरला आहे. मेहनती आणि प्रतिभावान खेळाडू असलेल्या फरीद हुसैन याची कारकीर्द नुकतीच आकार घेऊ लागली होती, पण तेव्हाच घात झाला असल्याच्या प्रतिक्रिया फरीदच्या सहकाऱ्यांनी दिल्या आहेत.

दरम्यान पोलीस अधिकारी या अपघाताची चौकशी करत आ-हेत. अपघाताच्या सीसीटीव्हीमध्ये फरीदच्या स्कुटरने कारच्या दरवाजाला जोरदार धडक दिल्याचं स्पष्टपणे दिसत आहे. या सीसीटीव्हीच्या आधारेच पोलीस पुढील तपास करत आहेत.

****


### टीम इंडियाचा प्रशिक्षक होण्यासाठी सौरव गांगुलीने डाव टाकला

मुंबई,-भारताचा माजी क्रिकेटपटू आणि कर्णधार सौरव गांगुली त्याच्या नव्या इनिंगची सुरूवात करत आहे. सौरव गांगुलीची टी-२० क्रिकेट टीमच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड झाली आहे. काहीच दिवसांपूर्वी गांगुलीने टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक व्हायची इच्छा व्यक्त केली होती. आपण भारतीय टीमचा प्रशिक्षक होण्यासाठी तयार असल्याचं गांगुली म्हणाला होता, त्यानंतर आता गांगुलीने टीम इंडियाचा प्रशिक्षक होण्याच्या मार्गात पहिलं पाऊल टाकलं आहे.

# विराट कोहली धमाकेदार पुनरागमनासाठी सज्ज!

लॉर्ड्स : टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. इंडियन प्रीमियर लीग (खझङ) २०२५ मध्ये कोहली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (ठउइ) साठी मैदानावर दिसला होता. त्यानंतर आरसीबीने पंजाब किंग्ज (झइघड) ला हरवून पहिल्यांदाच आयपीएलचे विजेतेपद जिंकले. आयपीएलच्या मध्यात कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. यामुळे, किंग कोहली इंग्लंड दौऱ्याचाही भाग होऊ शकला नव्हता.

मात्र आता विराट कोहली या वर्षी ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय सामन्यात दमदार पुनरागमन करण्याची शक्यता आहे. त्यासाठी कोहलीने ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या तयारीला देखील सुरूवात केल्याचे म्हंटले जात आहे. सध्या कोहली लंडनमधील लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर सरावात व्यस्त आहे.विराट कोहलीने लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडच्या बाहेर चाहत्यांसोबत फोटो देखील काढले. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थ येथे खेळला जाईल. त्यानंतर उर्वरित दोन एकदिवसीय सामने २३ ऑक्टोबर (ॲडिलेड) आणि २५ ऑक्टोबर (सिडनी) रोजी दोन्ही संघांमध्ये खेळले जातील.विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या एकदिवसीय क्रिकेटमधून



लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर सराव करताना दिसला

निवृत्तीबद्दल बीसीसीआयची प्रतिक्रिया

अलीकडेच, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीबद्दल अटकळ बांधली जात होती, परंतु भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) हे वृत्त फेटाळून लावले आहे. बीसीसीआयचा असा विश्वास आहे की, खेळाडूने स्वतः त्याच्या भविष्याचा निर्णय घ्यावा, बोर्ड कधीही कोणत्याही खेळाडूला जबरदस्तीने निवृत्ती घेण्यास सांगत नाही.

दरम्यान, आरसीबीचा युवा फलंदाज स्वस्तिक चिकाराने देखील विराट कोहली लवकरच पुनरागमन करणार असल्याची शक्यता चाहत्यांसोबत शेअर केली आहे, त्यामुळे विराट कोहलीच्या चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत विराट कोहली भारतीय संघाकडून खेळताना दिसू शकतो. या विश्वचषकासाठी अजून दोन वर्षांहून अधिक काळ शिल्लक आहे. अशा परिस्थितीत, विराट कोहलीला त्याची तंदुरुस्ती आणि फॉर्म कायम ठेवावा लागेल कारण तरुण खेळाडू सातत्याने चांगली कामगिरी करून संघात स्थान मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.




### टीम इंडियामधून ९ महिन्यांत ४ दिग्गजांनी घेतली निवृत्ती

मुंबई: भारतीय क्रिकेट संघात गेल्या काही महिन्यांपासून निवृत्तीची त्सुनामी आल्याचे चित्र आहे. गेल्या ९ महिन्यांत चेतेश्वर पुजारा, रविचंद्रन अश्विन, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांसारख्या ४ दिग्गज खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. यामुळे भारतीय क्रिकेटमध्ये एका नव्या पर्वाचा उदय झाला असून, नव्या खेळाडूंसाठी संधींचे दरवाजे उघडले आहेत.

चेतेश्वर पुजाराने जाहीर केली निवृत्ती

भारताचा दिग्गज कसोटीपटू चेतेश्वर पुजाराने रविवारी (२४ ऑगस्ट २०२५) आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्तीची घोषणा केली. गेल्या काही वर्षांपासून त्याला भारतीय संघात स्थान मिळत नव्हते, त्यामुळे त्याने हा निर्णय घेतला. पुजाराने आपल्या कारकिर्दीत १०३ कसोटी सामने खेळले असून, ४३.६० च्या सरासरीने ७,१९५ धावा केल्या आहेत. यात १९ शतकांचा समावेश आहे. आपल्या निवृत्तीच्या घोषणेवेळी तो भावूक झाला होता. भारतीय जर्सी परिधान करणे, राष्ट्रगीत गाणे आणि मैदानावर प्रत्येक वेळी आपला सर्वोत्तम खेळ दाखवणे हा अनुभव शब्दांत व्यक्त करणं शक्य नाही, असे त्याने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

या आधीही दिग्गजांनी दिला क्रिकेटला रामराम

पुजाराच्या निवृत्तीपूर्वीच भारतीय क्रिकेटमधील अनेक मोठ्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकला आहे.

रविचंद्रन अश्विन: गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेनंतर आर. अश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. तो भारताकडून कसोटीत दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा: या वर्षी मे महिन्यात इंग्लंड दौऱ्यासाठी संघाची निवड होण्यापूर्वीच विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. या दोघांनीही गेल्या दशकात भारतीय संघाचे यशस्वी नेतृत्व केले आहे.

या चार खेळाडूंच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमध्ये एका युगाचा अंत झाला आहे आणि आता नव्या दमाच्या खेळाडूंकडे संघाची

### पृथ्वी शॉच नशीब बदलले, शतकानंतर आणखी एक धमाका



मुंबई-टीम इंडियाचा स्टार खेळाडू पृथ्वी शॉला अखेर सूर गवसला आहे.महाराष्ट्र संघाकडून खेळताना त्याची दुसऱ्यांदा बॅट तळपली आहे. यावेळी त्याने ६६ धावांची अर्धशतकी खेळी आहे.या त्याच्या खेळीमुळे महाराष्ट्र संघाची धावसंख्या भक्कम झाली आहे. दरम्यान या अर्धशतकाआधी त्याने शतकही ठोकले होते. त्यामुळे पृथ्वी शॉची धडाकेबाज खेळी सूरू आहे.देशांतर्गत क्रिकेटमध्ये सध्या बुची बाबू स्पर्धा सूरू आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून खेळताना पृथ्वी शॉची उत्कृष्ट खेळी करतो आहे.नुकताच टीएनसीए प्रेसिडेंट्स इलेव्हन संघाविरूद्ध खेळताना त्याने अर्धशतकीय खेळी केली आहे. पृथ्वी शॉने ९६ बॉलमध्ये ६६ धावांची खेळी केली आहे. या खेळीत त्याने ९ चौकार लगावले आहेत. टीएनसीए प्रेसिडेंट्स इलेव्हनच्या पहिल्या डावातील ३८४९ धावांच्या आव्हानांचा पाठलाग करताना महाराष्ट्राची सुरुवातच खराब झाली होती. कारण कर्णधार सिद्धेश वीर लवकर बाद झाला होता. त्यानंतर पृथ्वी शॉने डाव सावरला होता.

## कॅमेरूनचे वेगवान शतक! अशी कामगिरी करणारा दुसराच फलंदाज

दिल्ली-ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील सुरूवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेने बाजी मारत मालिका खिशात घातली आहे. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजी करताना अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीनने वादळी शतकी खेळी केली. या शतकी खेळीसह त्याने ऑस्ट्रेलियासाठी वनडे क्रिकेटमध्ये मोठा विक्रम केला आहे.ऑस्ट्रेलियासाठी अशी कामगिरी करणारा दुसराच फलंदाज दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात कॅमेरून ग्रीनने अवघ्या ४७ चेंडूत वादळी शतकी खेळी केली. यासह तो वनडे क्रिकेटच्या इतिहासात ऑस्ट्रेलियासाठी दुसरा सर्वात वेगवान शतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज ग्लेन मॅक्सवेल या यादीत अव्वल स्थानी आहे. मॅक्सवेलने २०२३ मध्ये नेदरलँडविरुद्ध फलंदाजी करताना अवघ्या ४० चेंडूत आपलं शतक पूर्ण केले होते.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा फलंदाज कोण?आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान शतक झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत एबी डिविलियर्स अव्वल स्थानी आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या सामन्यात डिविलियर्सने अवघ्या ३१ चेंडूत वनडे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात वेगवान शतक झळकावले होते. हा विक्रम त्याने २०१५ मध्ये केला होता. आता २०२५ मध्ये म्हणजेच १० वर्षानंतरही या विक्रमाच्या जवळपासही कोणाला पोहोचता आलेले नाही.कॅमेरून ग्रीनची दमदार फलंदाजीया सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला होता. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांअखेर ४३१ धावांचा डोंगर उभारला. या सामन्यात डावाची सुरुवात करण्यासाठी आलेल्या ट्रॅव्हिस हेडने दमदार कामगिरी करत १०३ चेंडूत १४२ धावांची खेळी केली.त्यानंतर शेवटी ग्रीनने ११८ धावांची खेळी करत ऑस्ट्रेलियाला मजबूत स्थितीत पोहोचवले. कर्णधार मिचेल मार्शने १०० धावांची खेळी केली. तर ॲलेक्स कॅरीने नाबाद ५० धावांची खेळी केली. यासह ऑस्ट्रेलियाच्या टॉप ३ फलंदाजांनी शतके झळकावली. तर एका फलंदाजाने अर्धशतक झळकावले.



### हेड-मार्शची विक्रमी भागीदारी! ऑस्ट्रेलियाचा आफ्रिकेवर मोठा विजय




दिल्ली-दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील तिसरा सामना ग्रेट बॅरियर रीफ एरिनामध्ये पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजी करताना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड यांनी मोठा विक्रम मोडून काढला आहे. यासह दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय देखील मिळवला आहे.मार्श आणि हेडच्या जोडीचा मोठा विक्रमतिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि मिचेल मार्श यांनी दमदार फलंदाजी केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २५० धावा जोडल्या. ही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना कुठल्याही संघाने पहिल्या विकेटसाठी केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली. याआधी इंग्लंडच्या मार्कस ट्रेस्कोथिक आणि विक्रम सोलंकी यांच्या जोडीने मिळून २०० धावांची भागीदारी केली होती. आता ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी हा मोठा विक्रम मोडून काढला आहे.

ऑस्ट्रेलियाचा दमदार विजय-या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांअखेर २ गडी बाद ४३१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून सलामीला आलेल्या ट्रॅव्हिस हेडने १०३ चेंडूत १४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार मिचेल मार्शने १०० धावा केल्या. दोघांनी मिळून २५० धावांची विक्रमी भागीदारी केली. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कॅमेरून ग्रीनने ऑस्ट्रेलियाकडून खेळताना दुसरे सर्वात जलद शतक झळकावलं. त्याने ४७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने ११८ धावांची खेळी केली. तर शेवटी ॲलेक्स कॅरीने नाबाद ५० धावा केल्या.दक्षिण आफ्रिकेने मालिकेतील सुरवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दमदार विजय मिळवला होता. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ४३२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेव्हिसने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. तर उर्वरित एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेचा डाव १५५ धावांवर आटोपला. यासह ऑस्ट्रेलियाने हा सामना २७६ धावांनी आपल्या नावावर केला.

## फॅन्सनी आपल्या मर्यादेत रहावे. भारत - पाक मॅचपूर्वी वसीम अक्रमने दिली वॉर्निंग

मुंबई,२४ ऑगस्ट (पीएसआय)

आशिया कप २०२५ स्पर्धा ९ सप्टेंबर पासून सुरु होणार आहे. ही स्पर्धा यंदा यूएईच्या दुबई आणि अबुदाबी स्टेडियमवर खेळवण्यात येईल. पहलगाम हल्ल्यानंतर सुद्धा यंदा आशिया कपमध्ये भारत - पाकिस्तान सामना खेळवण्यात येणार आहे. या हायव्होल्टेज सामन्यापूर्वी वेगवान गोलंदाज वसीम अकरमने फॅन्स आणि क्रिकेटर्सला एक भावुक आवाहन केले होते.

जेव्हा भारत आणि पाकिस्तान हे दोन संघ क्रिकेटच्या मैदानात भिडतात तेव्हा या रोमांचक सामन्याकडे सर्वाचं लक्ष असतं. पहलगाम हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तानमध्ये संबंध अधिक ताणले गेले होते, त्यानंतर आता प्रथमच दोन संघ मैदानात समोरासमोर येणार आहेत. तेव्हा दोन्ही देशांच्या फॅन्स आणि क्रिकेटर्सनी आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवावं अशी विनंती वसीम अकरमने केली आहे.

काय म्हणाला वसीम अकरम ?

टेलिकॉम एशिया स्पोर्ट्स सोबत बोल-ताना वसीम अकरमने म्हटले की, 'मला खात्री आहे की हा सामना इतर भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्या इतकाच उत्तम असेल. मला खात्री आहे की दोन्ही संघांचे खेळाडू आणि चाहते त्यांच्या मर्यादेत राहतील. दोन्ही देशांमधील तणावपूर्ण परिस्थिती पाहता अकरमने हे वक्तव्य केलं आहे. अकरमने म्हटले की, 'भारत विरुद्ध पाकिस्तान सामना जगभरातील अब्जावधी लोक पाहतात. सामन्यादरम्यान खेळाडू आणि प्रेक्षकांनी शिस्त पाळावी अशी माझी इच्छा आहे'. अकरमने कबूल केले आहे की भारतीय संघ सध्या मजबूत आहे आणि तो आशिया कप विजेतेपदासाठी टीम इंडियाला प्रबळ दावेदार मानतो.



खेळ मंत्रालयाने केलं स्पष्ट :

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध हे अधिक ताणले गेले आहेत.त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणताही क्रिकेट सामना खेळला जाऊ नये अशी मागणी केली जात होती. यानंतर आता भारत सरकारच्या खेळ मंत्रालयाने नवीन धोरण लागू केलं असून भारत - पाक सामन्यांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. याअंतर्गत भारत कोणत्याही द्विपक्षीय सीरीज किंवा इव्हेंटमध्ये पाकिस्तान सोबत खेळणार नाही परंतू आंतरराष्ट्रीय सामने आणि स्पर्धांमध्ये पाकिस्तान विरुद्ध खेळण्यापासून टीम इंडियाला रोखलं जाणार नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे की, खेळ मंत्रालयाने आशिया कपमध्ये होणाऱ्या भारत - पाकिस्तान सामन्याला हिरवा कंदील दाखवला आहे आणि या सामन्याबाबत सरकारला कोणतीही आपत्ती नाही.

आशिया कपमध्ये भारताचे सामने कधी?

संयुक्त अरब अमीरात मध्ये ९ सप्टेंबर पासून आशिया कप २०२५ ला सुरुवात होणार आहे. यासाठी भारतीय संघाचं सेलेक्शन १९ ऑगस्ट रोजी केलं जाईल. यावर्षी आशिया कप टी२० फॉर्मेटमध्ये खेळवला जाणार असून यात भारताचा पहिला सामना हा १० सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमीरात मध्ये होईल. तर दुसरा सामना हा १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तानमध्ये होईल. भारताचा तिसरा ग्रुप स्टेज सामना हा १९ सप्टेंबर रोजी ओमानमध्ये होईल.

# खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना लातूर जिल्हा बँकेकडून १ हजार ४ कोटी २८ लाखाचे पीक कर्जाचे वाटप

## ■ इतर बँकांच्या तुलनेत पिक कर्ज वाटपात लातूर जिल्हा बँक सर्वात पुढे

## ■ शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम सातत्याने करत राहू – जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांची ग्वाही

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य व देशभरात सहकारातील यशस्वी बँक म्हणून ओळखली जात असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वर्ष २०२५-२०२६ मधील खरीप हंगामासाठी १ हजार ४ कोटी २८ लाखाचे पिक कर्ज वाटप केले आहे. शासनाकडून लातूर जिल्हा बँकेस ९३३ कोटी ९८ लाख एवढे पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. इतर बँकांच्या तुलनेत लातूर जिल्हा बँक पिक कर्ज वाटपात सर्वात पुढे पहिल्या स्थानावर असून शेतकऱ्यांच्या हक्काची बँक ही ओळख लातूर जिल्हा बँकेने कायम ठेवली आहे.

यावर प्रतिक्रिया देताना जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, वेळेवर कर्ज वाटप करून शेतकऱ्यांना मोठा आधार देण्याचे काम सातत्याने होत असल्याने सर्व शेतकऱ्यांना लातूर जिल्हा बँक आपली वाटते. तो विश्वास कायम ठेवत शेतकरी हिताची वाटचाल सुरू असून भविष्यात देखील त्याच भावनेतून काम करत राहू अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

शासनाकडून लातूर जिल्हयातील सर्व बँकांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज वाटपाचे ३ हजार १०० कोटी एवढे उद्दिष्ट देण्यात आले होते. यापैकी एकट्या लातूर जिल्हा बँकेने १३०२४४ शेतकरी सभासदांना १ हजार ४ कोटी २८ लाख एवढ्या रक्कमेचे पीक कर्ज





वाटप केलेले आहे. पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी असून लातूर जिल्हा बँकेने १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत १०८ टक्के एवढे उद्दिष्ट गाठले आहे.सप्टेंबर २०२५ अखेर जवळपास १३५% पिक कर्ज उद्दिष्ट पुर्तता होईल असे बँकेच्या वतीने कळवण्यात आले आहे.

एकट्या लातूर जिल्हा बँकेने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक १०८ टक्के एवढे पीक कर्जवाटप करून शेतकऱ्यांप्रती बांधिलकी जोपासली आहे.

प्राप्त आकडेवारीचा तुलनात्मक विचार केल्यास इतर बँकांच्या तुलनेत लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १०८ टक्के केलेले कर्जवाटप हे उल्लेखनीय आहे. लातूर जिल्हा बँकेच्या या उद्दिष्ट पूर्ति मूळे शासनाने दिलेल्या उद्दिष्टात लातूर जिल्हा बँकेने मोलाचा वाटा उचलला आहे.

लातूर जिल्हा बँकेचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब, सर्व संचालक मंडळाने सातत्याने लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न करत असल्याचे यावरून दिसून येत आहे.

# महागणेशोत्सवात सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांचे आवाहन

### महागणेशोत्सव राज्य उत्सवानिमित्त गीत आणि पोर्टलचे लोकार्पण



**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक गणेशोत्सव, घरगुती गणेशोत्सव, या महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला आता राज्याने प्रथमच महाराष्ट्र राज्याचा राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे. त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या विभागांनी विविध उपक्रम, कार्यक्रम, उत्सव तसेच स्पर्धेचे आयोजन केले आहे. याचाच भाग म्हणून राज्यातील प्रत्येक नागरिकास घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाचे दर्शन मिळावे, यासाठी ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलची निर्मिती करण्यात आली असून सामान्य नागरिकांनी तसेच दिव्यांग बांधवांनी याद्वारे घरबसल्या दर्शनाचा लाभ घ्यावा आणि आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांच्या हस्ते एमएसआरडीसी, वांद्रे येथे ''आला रे आला राज्य महोत्सव आला'' या गीताचे आणि ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभिषण चवरे उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा आता तालुकास्तरापर्यंत विस्तारित करण्यात आली असून विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पोरितोषिकांच्या रकमांमध्येही भरघोस वाढ करण्यात आली आहे. राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरील प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याकरिता प्रवेश अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचबरोबर, खुल्या गटातून महसूल विभागीय स्तरावर व राज्यस्तरावर रील बनविण्याची स्पर्धा होणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

भजनी मंडळांना भांडवली अनुदान देण्याची योजना असल्याचे सांगत सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, १८०० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रूपये यानुसार भांडवली अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यासाठीचे अर्ज २३ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या दरम्यान https://mahaanudan.org या वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर व्याख्यानमाला, आध्यात्मिक नाट्यरंग महोत्सव, ड्रोन शो, टपाल तिकिटे, चौकांचे सुशोभीकरण, विद्युत रोशणाई अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीने सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी राज्यातील सर्व जनतेला गणरायाच्या आगमनाच्या शुभेच्छा दिल्या.

# केशवराज माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय अंतराळ दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २३ ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी राष्ट्रीय अंतराळ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी तसेच परिपाठ प्रमुख लता कुलकर्णी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मंचावरील मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आली.



याप्रसंगी राधिका बिडवे (दहावी क) या विद्यार्थिनीने राष्ट्रीय अंतराळ दिनाची माहिती सांगितली. दि.२३ ऑगस्ट रोजी भारताने चंद्रयान- ३ मोहिमेअंतर्गत विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हर चंद्रावर यशस्वीपणे उतरवला. त्यामुळे भारत चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करणारा जगातील चौथा देश बनला आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा प्रथम देश ठरला. याची आठवण म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून घोषित केला, असे सांगितले. तसेच आठवी अ मधील साईनी सुडके, माहेश्वरी पाटील, किमया शेटकर या विद्यार्थिनींनी चंद्रयान-३ या विषयावर आधारित चित्र काढून आणले. मैथिली जाधव व अवनी राजमाळे या विद्यार्थिनींनी चंद्रयान -३ ची प्रतिकृती तयार करून आणली.

विज्ञान मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान मंडळ प्रमुख अनुपमा पाटील यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# प्रा. हरेराम त्रिपाठी यांना राज्यपालांची श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. हरेराम त्रिपाठी यांच्या अपघाती निधनाबद्दल राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. हरेराम त्रिपाठी व त्यांच्या पत्नीचे उत्तर प्रदेश येथील कुशीनगर जवळ अपघाती निधन झाल्याचे वृत्त समजून अतिशय दुःख झाले. प्रा. हरेराम त्रिपाठी हे संस्कृतचे विद्वान, संशोधक व लोकप्रिय शिक्षक होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी संस्कृत भाषेच्या प्रचार प्रसारासाठी निष्ठेने कार्य केले. त्यांच्या प्रयत्नामुळे साकार झालेल्या विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय हेडगेवार शैक्षणिक भवनाचे नुकतेच उद्घाटन झाले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठात पायाभूत सुविधांचा विकास, चर्चासत्रांचे आयोजन तसेच संशोधन प्रकल्पांवर उल्लेखनीय काम झाले. त्यांच्या निधनामुळे संस्कृत भाषेसाठी निष्ठेने झटणारा एक संशोधक, अभ्यासक व उत्तम प्रशासक गमावला आहे, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# 'बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत ठाकरेंचा पराभव', राज ठाकरेंना प्रश्न विचारताच त्यांनी एका वाक्यात दिले उत्तर

**मुंबई/प्रतिनिधी :** बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या संयुक्त उत्कर्ष पॅनेलचा दारूण पराभव झाला. ठाकरे बंधूच्या पॅनेलम धील सर्वच्या सर्व २१ उमेदवारांना पराभवाचा साम ना करावा लागला. तर भाजपाचे प्रसाद लाड आणि शशांक राव यांच्या पॅनेलचा मोठा विजय झाला. आज राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना निवडणुकीच्या निकालाबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी एका वाक्यात हा विषय संपवला.

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.ची पंचवार्षिक निवडणूक सोमवारी (१८ ऑगस्ट) पार पडली. भर पावसात कामगारांनी निवडणुकीला चांगला प्रतिसाद दिले त्यामुळे ८३ टक्के मतदान झाले. बेस्ट उपक्रमाची सर्व आगरे आणि बेस्टची कार्यालये अशा ३५ केंद्रावर ही निवडणूक पार पडली.

# औसा तालुक्याची वाटचाल हरितक्रांतीच्या दिशेने

## ■ बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेला मुख्यमंत्र्यांकडून १९० कोटींची मंजुरी

## ■ ३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

**औसा/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील शेतकऱ्यांची खऱ्या अर्थाने हरितक्रांती च्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे.ऐकीकडे आमदार अभिमन्यू पवार यांनी जलसमृद्ध औसा अभियान हाती घेत संपूर्ण मतदारसंघ पाणीदार करण्याचा संकल्प केला असताना दुसरीकडे त्यांच्या प्रयत्नांतून बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेसाठी मोठे यश मिळाले आहे. या योजनेसाठी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १९० कोटीच्या निधीला मंजुरी दिली आहे. हि योजना दहा ते पंधरा गावातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडणारी असून त्यासाठी बेलकुंडसह परिसरातील तब्बल ३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

आ अभिमन्यू पवार यांनी निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलाशयातून बेलकुंड उपसा जलसिंचन याजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषण () कामास मंजुरी मिळवून घेऊन सर्वेक्षणाचे काम सुरु करवून घेतले होते. सर्वेक्षण व अन्वेषण काम पूर्ण झाल्यानंतर अंदाजपत्रकासह अहवाल मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला होता. या १९० कोटी रुपयांच्या बेलकुंड उपसा सिंचन योजनेला (दि.२२) रोजी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. लवकरच सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. बेलकुंड उपसा सिंचन योजनेमुळे बेलकुंड, व आजूबाजूच्या १० ते १५ गावांमधील जवळपास ३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.बेलकुंड उपसा सिंचन योजनेसाठी धरणाजवळ ५२५ एचपी क्षमतेचे ४ पंप असलेले पंपगृह उभारले जाणार आहे. पंपगृहापासून बेलकुंड वितरण कुंडापर्यंत १०५० एमएम व्यासाची व ७.१५ किमी लांबीची एमएस पाईपलाईन निर्माण केली जाणार असून सिंचन कालावधीत उर्ध्वनलिकेद्वारे पाणी उपसा केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे कालवा, वितरिका वा चारी या पारंपरिक प्रणालींऐवजी बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे भूसंपादनाची आवश्यकता भासणार नाही आणि पाण्याचाही इष्टतम वापर होणार आहे.निम्न तेरणा प्रकल्पाच्या प्रवाही कालव्याद्वारे भिजणारे उमरगा, निलंगा व औसा तालुक्यातील ११६१० हे. सिंचन क्षेत्र तसेच आशिव उपसा सिंचन योजनेवरील ६८९० हे. सिंचन क्षेत्र व पाणीसाठा कायम ठेवण्यात आला असून निम्न तेरणा प्रकल्पाच्या खालील भागात तेरणा नदीवरील बांधण्यात आलेल्या नऊ बॅरेजेसच्या लाभ क्षेत्रातील पाणीवापरात होणारी बचत विचारात घेऊन बेलकुंड उपसा सिंचन योजना तयार करण्यात आली आहे.

बेलकुंड एमआयडीसी उभारण्याचे काम जलदगतीने सुरू आहे. सुमारे २४८ हेक्टरवर उभारणाऱ्या या एमआयडीसी मुळे या भागात औद्योगिक विकास होणार आहेच तर बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेमुळे या भागात हरितक्रांती घडून येणार आहे. या दोन्ही योजना तालुक्याच्या विकासासाठी मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

निम्न तेरणा प्रकल्पाचे काम जून १९८९ मध्ये पूर्ण झाले आहे. तेरणा नदीवरील नऊ अस्तित्वातील को.प.बंधाऱ्याचे बॅरेजेस मध्ये रूपांतरण कामे प्रकल्पाचा भाग म्हणून पूर्ण करण्यात आली आहेत. तेरणा नदीवरील बॅरेजेस मध्ये धरणाखालील मुक्त पाणलोट क्षेत्रातील ११.८०२ दलघमी (दहालाख घनमीटर.) पाणी येवा उपलब्ध होतो बॅरेजेस चे सिंचन क्षेत्र प्रवाही कालव्याचे लाभक्षेत्र एकच (आच्छादित) आहे. कालव्याचे प्रवाही लाभ बॅरेजेस मधून उपसा करून सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे कालव्याद्वारे पाण्याचा पुरेपूर वापर होत नाही. त्यामुळे बॅरेजेस स्थळी पाण्याचा वापर लाभक्षेत्रात करून जलाशयातून ११.८०२ दलघमी पाणी फ



`र नियोजन करून बेलकुंड उपसा सिंचन योजनेस प्रस्तावित आहे. कालव्याचा प्रवाही पाणीवापर, आशिव उपसा सिंचन योजनेचा मंजूर पाणीवापर, बिगर सिंचन मंजूर पाणीवापर कायम ठेवण्यात आला आहे. अतिरिक्त ११.८०२ दलघमी प्रस्तावित आहे. पाणीवापर फ `र नियोजनामुळे बेलकुंड व परिसरातील दहा ते पंधरा गावातील ३ हजार . क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**–आमदार अभिमन्यू पवार**

# अभाविपचा धाराशिव जिल्हा अभ्यासवर्ग यमगरवाडी येथे संपन्न

**धाराशिव/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, धाराशिव जिल्ह्याचा जिल्हा अभ्यासवर्ग दिनांक १६ व १७ ऑगस्ट रोजी एकलव्य विद्या संकुल, यमगरवाडी ता. तुळजापूर येथे संपन्न झाला. दोन दिवसीय अभ्यासवर्गामध्ये विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. यात जन नायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त प्रदर्शनी कक्षास भगवान बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले. प्रमुख अतिथी महंत मावजीनाथ, अभाविप धाराशिव शहराध्यक्ष प्रा. प्रशांत गुरव, शहर मंत्री कु. साक्षी पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. अभ्यासवर्ग उद्घाटन सत्र अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले, जिल्हा संयोजक कुमारी वैष्णवी थिटे व अभ्यासवर्ग प्रमुख जयराम गंभीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ धाराशिव जिल्हा मा.



संघचालक ड. रवींद्र जी कदम यांनी संघ शताब्दी या विषयावर भाषण केले. आदित्य पाटील यांनी अभ्यासवर्गाची व्यवस्था पाहिली. जिल्हा अभ्यासवर्गामध्ये विद्यार्थी विकास, नेतृत्वगुण, अभाविप कार्यपद्धती, कार्यकर्ता व्यवहार, मनोरंजन सत्र, महाविद्यालय सक्रियता, प्रवास व संपर्क इ. सत्र घेण्यात आले. अभ्यासवर्गाच्या समारोप प्रसंगी अभाविप धाराशिव जिल्ह्याची जिल्हा समिती घोषित करण्यात आली. जिल्हा सहसंयोजक अक्षय माळी, राजेश कवडे, जिल्हा कार्यालय प्रमुख उज्वल गाढवे, उमरगा तालुका संयोजक अभिषेक मिसाळ, सहसंयोजक पंकज बेळकोने, जिल्हा समिती सदस्य म्हणून अंबिका मोरे, ओमप्रसाद जाधव, अजय टोले यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.



# श्रीगणेश उत्सवानिमित्त भारतीय रेल्वेने आतापर्यंत ३८० विशेष गाड्यांची घोषणा केली ज्यामध्ये पनवेल-चिपळूण दरम्यान ६ अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रेल्वेने २०२५ साली ३८० गणपती विशेष गाड्यांच्या सेवा चालविण्याची घोषणा केली आहे. जी आतापर्यंतची विक्रमी संख्या असून प्रवाशांचा सणासुदीच्या वेळी प्रवास अधिक सुकर व आरामदायी होईल. २०२३ मध्ये एकूण ३०५ गणपती विशेष ट्रेन सेवा चालवण्यात आल्या, तर २०२४ मध्ये ही संख्या ३५८ होती.

मध्य रेल्वेने गेल्या काही वर्षांमधील प्रथमच ३०२ विशेष सेवा उपलब्ध करून देत महाराष्ट्र आणि कोकण विभागातील सणासुदीच्या काळात येणारी प्रचंड प्रवासांची वाढती मागणी पूर्ण केली आहे.

गणेशोत्सव विशेष गाड्यांचे कोकण रेल्वेवरील थांबे पुढीलप्रमाणे नियोजित करण्यात आले आहेत : कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड, अंजनी, चिपळूण, कामथे, सावर्डे, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडावली, विलोवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, झाराप, सावंतवाडी रोड, माडुरे, थिवी, करमळी, मडगाव जं., कारवार, गोकर्ण रोड, कुमटा, मुरूडेश्वर, मूकांबिका रोड, कुंदापूर, उडुपी, मुल्की आणि सुरतकल.

गणेशोत्सव पूजा २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान साजरी करण्यात येणार असून, (श्री गणेशाचे आगमन होणार असून २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत असेल) प्रवासी गर्दी लक्षात घेता २२ ऑगस्ट २०२५ पासून गणेशोत्सव विशेष गाड्यांचे संचालन सुरू करण्यात आले आहे. उत्सव जवळ येत असताना या गाड्यांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येत आहे.

पनवेल आणि चिपळूण दरम्यान ६ अनारक्षित गणपती विशेष रेल्वे सेवांची घोषणा करण्यात आली आहे.

तपशील खालील प्रमाणे: पनवेल – चिपळूण अनारक्षित गणपती विशेष (६ सेवा)

०११५९ अनारक्षित विशेष ट्रेन पनवेल येथून दि. ०५.०९.२०२५, ०६.०९.२०२५ व ०७.०९.२०२५ रोजी १६.४० वाजता सुटेल व चिपळूण येथे त्याच दिवशी २१.५५ वाजता पोहोचेल. (एकूण ३ सेवा)


०११६० अनारक्षित विशेष ट्रेन चिपळूण येथून दि. ०५.०९.२०२५, ०६.०९.२०२५ व ०७.०९.२०२५ रोजी ११.०५ वाजता सुटेल व पनवेल येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल. (एकूण ३ सेवा)

थांबे : सोमटने, आपटा, जिते, पेण, कासू, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगांव रोड, वीर, सापे वामने, करंजडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि अंजनी.

संरचना: ८ मेमू कोच

अनारक्षित कोचसाठी बुकिंग यूटीएस प्रणालीद्वारे करता येते, ज्यात लागू असल्यास अनारक्षित निवासासाठी सामान्य शुल्क आकारले जाते.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. विशेष गाड्यांचे तपशीलवार वेळापत्रक



IRCTC वेबसाइट, RailOne ॲप आणि संगणकीकृत PRS वर देखील उपलब्ध आहे. भारतीय रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, खात्रीशीर व सुलभ प्रवास देण्यास कटिबद्ध असून, सणासुदीच्या काळातील वाढत्या मागणीची विशेष काळजी घेत आहे.

## निलंगा तालुक्यात पावसामुळे पिकांना फटका

**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा तालुक्यात १४ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे निलंगा तालुक्यातील निलंगा औराद शहाजानी, तांबरवाडी, हालसी, होसूर चिचोडी, निटूर, बसपुर, शिरोळ वा., केळगाव या गावातील शेतकऱ्याच्या शेती पिकाची अतोनात नुकसान झाले आहे.

शेतातील सोयाबीन, मूग, उडीद है पौक भुईसपाट झाले असून मुगाच्या शेंगाला कोंब फुटले आहेत. यामुळे हजारो हेक्टरी पिके हातचे निघून गेले असून शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला आहे. कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटाचा सामना हा शेतकऱ्याला नेहमीच करावा लागत आहे यावर्षी खरिपाचे पीक सोयाबीन उडीद तूर मूग हे चांगले डोलत होते.

मात्र मागील चार दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्याचे काढनिला आलेले मृगाच्या शेंगांना जागेवर कोम फुटून उगवले आहे. तर इतर पिके पाण्याखाली जाऊन नुकसान झाले आहे. महसूल विभागामार्फत तहसीलदाराने शेतकऱ्याच्या शेती पिकाचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन सुद्धा कोणता आधीकारी हा शेतकऱ्याच्या बांधावर यायला तयार नाही.

## आंबेडकरी चळवळी सोबत राहून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सामाजिक कार्य करावे : प्रा.अनंत लांडगे

**लातूर/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी संघटित होऊन सेवानिवृताचे प्रश्न तर सोडवून घ्यावेतच परंतु आंबेडकरी चळवळी सोबत राहून त्यांनी सामाजिक कार्य ही करावे असे आवाहन प्रा, अनंत लांडगे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बैठकीत केले, डॉ, बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाची बैठक पार पडली त्या बैठकीत त्यांनी आपले मत व्यक्त केले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विजय श्रृंगारे हे होते, या बैठकीत सेवा निवृतांच्या विविध प्रश्नावर विचार विनिमय केल्या नंतर जिल्हाध्यक्ष प्राचार्य एस, टी,



मस्के यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला, या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी नगरसेवक तथा गट नेते चंद्रकांत दादा चिकटे, महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवंत उबाळे, माजी शिक्षण सभापती अशोकराव कांबळे, पोलीस क्राईम न्यूज चे मुख्य संपादक डी, एल, वाघमारे हे उपास्थित होते, त्यांनीही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले, या बैठकीला बलभीम कोथिंबीरे, प्राचार्य एस, टी, मस्के, प्राचार्य विजय श्रृँगारे, माणिक पवार, बी, बी, गायकवाड, विनायक बोरीकर, रमेश श्रृँगारे, राजेंद्र बनसोडे, संभाजी शिंदे औसा, रमेश हणमंते, पी, एस, कांबळे, एस, एस, धसवाडीकर, श्रीधर ओहळ इत्यादी सह बहू संख्य सेवानिवृत्त उपसस्थित होते, विनायक बोरीकर यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली,

## क्षुल्लक कारणावरून एस.टी. महिला कर्मचाऱ्यावर प्रवाशाने उगारला हात; आगारात संतापाची लाट

**निलंगा/प्रतिनिधी :** बसमधील प्रवाशांना केवळ मागे सरका असे सांगितल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका संतप्त प्रवाशाने एसटी महिला वाहकाला बेदम मारहाण करून बसमधून खाली ढकलण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना झरी येथे घडली. या प्रकारामुळे निलंगा आगारातील एस.टी. कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. निलंगा आगाराची उदगीर-निलंगा बस (क्र. एमएच १४ बीटी १४२०) बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास झरी गावातील थांब्यावर आली. बसमध्ये गर्दी असल्याने महिला वाहक सविता तानाजी घंटे (बॅच क्र. १३११०) यांनी प्रवाशांना मागे सरकून उभे राहण्याची विनंती केली. याचा राग मनात धरून प्रवासी सुधाकर याने वाहक सविता घंटे यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की, पाटील याने त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. इतकेच नव्हे, तर त्याने क्रूरतेचा कळस गाठत त्यांना चालत्या बसमधून खाली ढकलण्याचाही प्रयत्न केला. या घटनेमुळे बसमधील इतर प्रवासी आणि चालकही हादरले.

## हरवले आहे

आनंद तानाजीराव जाधव या नावाचे देवगिरी कॉलेज औरंगाबाद ची बी एस सी (आय टी) टीसी आणि १२ वी ची सनद ही मुळ कागदपत्रे निलंगा बसस्थानक येथे हरवले आहे. तरी कोणाला आढळून आल्यास खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

–संपर्क मो क्र ८४२१६३४०४४

## नळेगाव येथे मंडल यात्रेचे भव्य स्वागत




**नळेगाव/अजगर मजकुरी :** राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार पक्ष च्या वतीने नळेगाव ता चाकूर येथे मंडलयात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले याप्रसांगी ओबीसी चे प्रदेश अध्यक्ष राजा राजापूरकर, माजी आमदार विनायकराव पाटील यांचे व मनडलयात्रेचे स्वागत प्राचार्य माधव गंगापुरे यांनी केले. याप्रसंगी प्रदेश सचिव प्राचार्य माधव गंगापुरे,प्रदेश उपाध्यक्ष संभाजीराव पाटील,जिल्हाअधक्ष संजय शेटे, युवा नेते अमर पाटील, अभिजित पाटील,विद्यार्थी सेलचे जिल्हा अध्यक्ष चेतन पाटील, सेवादलाचे जिल्हा अध्यक्ष राधाकिशन तेलंग, काँग्रेचे सेवादलाचे अध्यक्ष अनिल चव्हाण, उमाकांत सावंत,तालुका कार्याध्यक्ष राजू शेलार,माजी चेअरमन दयानंद मानखेडे,जिल्हासचिव अतिक पटेल, ॲड. मलशेट्टे चंदू डोरले, युवराज पाटील, संतोष तेलंगे,व उपस्थित पक्षाचे नेते पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या मंडल यात्रेचे निलंगा येथे जल्लोषात स्वागत



**निलंगा/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने महाराष्ट्रभर नागपुर हुन चालु झालेली भर मंडल यात्रा ही आज वाजत गाजत फटाकेटी आतषबाजी मध्ये निलंगा येथे पोहोचली या यात्रेचे नेतृत्व ओबीसी सेलचे प्रदेश अध्यक्ष राज राजापुरकर हे करत आहेत.

निलंगा येथे आगमण होताच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करुन सुरुवात झाली

या यात्रेचे मागासवर्गीय मराठवाडा सेल चे अध्यक्ष प्रास्ताविक लक्ष्मण कांबळे यांनी केले.

भाजपा वर टिकेची झोड उठवत राष्ट्रीय अध्यक्ष युवती सेलच्या सक्षणा सलगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

व्होट चोरी करुन आलेले हे सरकार चोर आहे यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. तसेच मराठा समाज सुध्दा आरक्षणापासुन वंचित नसला पाहिजे अशी भूमिका प्रदेशाध्यक्ष राज राजापुरकर यांनी व्यक्त केली तसेच मनोजदादा जरांगे पाटिल यांच्या भुमिकेला पांठिबा दर्शविला.

यावेळेस संभाजी (मालक) पाटील यांनी समर्थन दिले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष शिरुर अनंतपाळ चे संभाजी (मालक) पाटिल, तालुकाध्यक्ष सुधीरदादा मसलगे, युवक चे तालुका अध्यक्ष महेश चव्हाण, शहराध्यक्ष ईफरोज शेख,मा.जिल्हा उपाध्यक्ष अंगद जाधव,प्रदेशचे किरण सोळुंके, युवक शहराध्यक्ष रोहन सुकाले,मुसा पठाण, सचिन राजनाळे, अभय चौधरी जिल्हा कार्यकारिणी चे इंजि. विनायक बगदुरे, ईस्माईल लदाफ,संदीप मोरे, यशवंत पवार,अलिबाबा,व्यंकट सूर्यवंशी, लक्ष्मण क्षीरसागर, रामदास कोकरे, फारुक पांढरे,फारुक शेख,यासह शेकडो कार्यकर्ता उपस्थित होते.

## रस्ते. ..

मोठ मोठाले मंडप
अडवून ठेवी रस्ते
वाहतूकी ऐशी तैशी
रहदारी चाले आस्ते

कायम काही उत्सव
चालूचं राही शिरस्ते
पाघळू जाई जनता
पुढारीकरता नमस्ते

सर्व धर्मियांचे सण
काही कारण असते
सामान्यां होतो त्रास
कुणाकाळजी नसते

रूग्ण वाहिका कधी
वाटेतअडकून बसते
मृत्यू उभा वळणावर
भिती हृदयात घुसते

कामेसारी महत्त्वाची
अडथळे उगा सोसते
सरळ चालली गाडी
चाक चिखला फसते

मैदान घेऊन मोठाले
उत्सव करावे नुसते
अडवून फुकटा रस्ते
का धंदे करता नसते

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## बी व्हीं जी Dial 108 रुग्णवाहिका तर्फे गुड समरीटन ॲप चे प्रशिक्षण

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथे न्यू व्हिजन नर्सिंग स्कूल येथे २१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत BVG महाराष्ट्र आपत्कालिन वैद्यकीय सेवेच्या लातूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. संदीप राजहंस उपजिल्हा व्यवस्थापक श्रीकृष्ण दिंडगे आपत्कालिन वैद्यकीय अधिकारी डॉ सुहास चव्हाण आणि आपत्कालिन सहाय्यक श्री अमरजित सांगवे यांनी न्यू व्हिजन नर्सिंग स्कूल येथे जावून Dial 108 रुग्णवाहिकेची सविस्तर माहिती दिली तसेच Good Samaritan App बद्दल विस्तृत महिती PPT presentation व्दारे ११० विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आणि ३० शिक्षक आणि ईतर कर्मचारी यांना महिती दिली आणि प डाऊनलोड कसे करायचे हे प्रत्यक्ष करुन दाखवले चांगला सामरिटन (Good Samaritan)



म्हणजे अशी व्यक्ती जी कोणत्याही फायद्याची अपेक्षा न करता किंवा हानी न पोहोचवता इतरांना मदत करते. विशेषतः, हे कायदेशीर संरक्षण असते जे आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्या व्यक्तींना कायदेशीर कारवाईपासून किंवा छळापासून वाचवते, जेणेकरून ते धोक्यात असलेल्या लोकांना मदत करण्यास घाबरणार नाहीत.

या कार्यक्रमाच्या वेळेस नर्सिंग स्कूल चे संचालक अरुण कदम आणि प्राचार्या सौ. कदम मॅडम यांनी संपूर्ण कार्यक्रम संचालन करुन १०८ रुग्णवाहिका संपूर्ण स्टाफ चे आभार मानले आहेत.

कार्यक्रम यशस्वतेसाठी लातूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. संदीप राजहंस श्री. चंद्रप्रकाश जगताप लातूर जिल्हा समन्वयक BVG चे श्री विठ्ठल बोडखे सर आणि श्री. अरुण कदम सर यांनी परिश्रम घेतले तर प्रशिक्षण दिल्याबद्दल BVG चे मुख्य व्यवस्थापक डॉ. किशोर देव सर आणि डॉ. दिपक कुमार उके सर आणि लातूर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले सर यांनी अभिनंदन केले.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६